# जाहिरात

## ए.एन.एम. प्रशिक्षण (२ वर्षे कालावधी) प्रवेश प्रक्रिया २०२३-२४ मधील रिक्त जागांसाठी प्रवेश अर्ज मागविण्यात येत आहेत

## जिल्हा रुग्णालय, औंध, पुणे - २७

जिल्हा रुग्णालय, औंध, पुणे येथे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता सुरु असलेल्या दोन वर्षांच्या स्त्री सहाय्यकारी परिचारीका प्रसाविका (ए.एन.एम.) प्रशिक्षणाकरिता रिक्त असलेल्या २४ जागांसाठी खालील प्रवर्गाच्या स्त्री उमेदवार / आशा स्वयंसेविकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु. जाती | अनु. जमाती | वि. जा.अ. | भ. ज. ब. | भ. ज. क. | भ. ज. ड. | वि. मा. प्र. | इ. मा. व. | आर्थिक दुर्बल घटक | खुला | एकूण २४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

**१) वयोमर्यादा : दिनांक ३१/०७/२०२३** रोजी १७ वर्षे पूर्ण ते ३५ वर्षापर्यंत. **२) शैक्षणिक पात्रता :** १२ वी विज्ञान शाखेत (जीवशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्रसह) किमान ४५ टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ३) उमेदवाराविरुध्द कोणत्याही गुन्हयाची नोंद किंवा न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असू नये. ४) इच्छुक उमेदवारांना विहीत नमुन्यातील अर्ज **दिनांक १६/११/२०२३ ते दिनांक २०/११/२०२३ दरम्यान सर्व दिवस सकाळी १० ते सायंकाळी ५** या वेळेत परिचर्या प्रशिक्षण प्रशाला, तिसरा मजला, उरो रुग्णालय, सांगवी फाटा, औंध, पुणे - २७ येथे सशुल्क मिळतील. खुल्या प्रवर्गासाठी रुपये ४००/- आणि राखीव प्रवर्गासाठी रुपये २००/- इतके शुल्क आकारण्यात येईल. ५) अर्ज मागणी करताना उमेदवारांनी १२ वीचे गुणपत्रक, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला यांच्या छायांकित व साक्षांकित प्रती सोबत आणाव्यात. ६) शैक्षणिक अर्हता प्राप्त आशा उमेदवारांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल. **७) अपंग आरक्षण-** इंडियन नर्सिंग कौन्सिलच्या पत्र क्र. एफ नं. १-५/२०१८ दिनांक १९/०४/२०१९ च्या परिपत्रकानुसार "Disability of locomotor to the tune of 40% to 50% of the lower extremity" यानुसार शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवारांचा आरक्षणानुसार विचार करण्यात येईल. ८) अनाथ व्यक्तींचा, शासन निर्णय क्र. - अनाथ - २०१८ / प्र. क्र. १८२/का- ०३ दि. २३/०८/२०२१ नुसार, जिल्हास्तरीय महिला व बाल कल्याण विभाग किंवा समकक्ष कार्यालयाचे प्रमाणपत्र सादर केल्यास शैक्षणिक पात्रतेनुसार विचार करण्यात येईल.

**इतर नियम-** १) पूर्ण भरलेले अर्ज **दिनांक १६/११/२०२३ ते दिनांक २१/११/२०२३** सायंकाळी ५ वाजेपर्यंतच स्विकारले जातील. २) अपूर्ण भरलेल्या, आवश्यक प्रमाणपत्राची पूर्तता न केलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही व उशिरा आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. ३) सर्वसाधारण गुणवत्ता यादी व प्रवेश समुपदेशन संवादपात्र उमेदवारांची यादी परिचर्या प्रशिक्षण प्रशाला येथे **दिनांक २२/११/२०२३** रोजी **दुपारी ०१ बाजता** प्रसिद्ध करण्यात येईल. **प्रवेश समुपदेशन संवादपत्र व निवडपत्र टपालाने पाठविण्यात येणार नाही.** ४) पात्र उमेदवारांचा, प्रवेश समुपदेशन संवाद व मूळ प्रमाणपत्र पडताळणी **दिनांक २३/११/२०२३ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत** परिचर्या प्रशिक्षण प्रशाला येथे करण्यात येईल. ५) उमेदवारांना प्रवेश समुपदेशन संवादासाठी स्वखर्चाने यावे लागेल. ठरविलेल्या दिनांक व वेळेत प्रवेश समुपदेशन संवादासाठी हजर न झालेल्या उमेदवाराची कोणतीही सबब व तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. ६) उमेदवार वैद्यकियदृष्टया पात्र असणे आवश्यक आहे. ७) प्रशिक्षण कालावधीत शिस्त व वर्तणुक नियमांचे काटेकोरपणे पालन होईल या विषयीचे १००/- रु. च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल. ८) उमेदवारांची निवड शैक्षणिक गुणवत्तेनुसार व आरक्षाणानुसार केली जाईल. ९) निवडीबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

सही/-
जिल्हा शल्यचिकित्सक
जिल्हा रुग्णालय, पुणे

Mahabharti.in